# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

जा. क्र. मि.भा./मनपा/नर/ २५५७ / २०१३-१४ दिनांक :- १८/१०/२०१३

प्रति,
जमीन/जागामालक - मे.कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा)
अधिकार पत्रधारक - मे. रवि डेव्हलपमेंट
द्वारा - वास्तुविशारद - मे. अविनाश म्हात्रे अँन्ड असो.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - पेणकरपाडा सर्वे क्र./ हिस्सा क्र. स.क्र. २२६पै., २२७पै., २२८पै., २२९पै., २३०पै. व मौजे मिरा, स.क्र. १५०पै., १५१पै. या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- १) आपला दि. ०१/०७/२०१३ व दि.१०/०७/२०१३ चा अर्ज.
२) कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) यांचेकडील पत्र क्र. सीओ/केबी-१४६७/१०, दि.०६/०८/१० चे पत्र.
३) शासनाचे पत्र क्र. टिपीएस-१२०८/युओआर-१५०/सीआर-४४६/०८/युडी-१२, दि.३०/०४/२०१०.
४) या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/नर/१८६७/२०१०-११, दि.११/०८/२०१० अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.
५) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/१५/१०-११, दि.१५/०७/१० व पत्र क्र. मनपा/अग्नि/३५८/२०१३-१४, दि.१५/०५/२०१३ अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला.

## -: सुधारीत बांधकाम प्रारंभपत्र :- (सुधारीत नकाशे मंजूरीसह)

(क्लस्टर २ मधील इमारतीकरिता जोत्यापर्यंत)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४४, ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ ते २६९ विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे – पेणकरपाडा सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. स.क्र. २२६पै., २२७पै., २२८पै., २२९पै., २३०पै. व मौजे मिरा, स.क्र. १५०पै., १५१पै. या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

१) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.

२) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जमीनीवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.